# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/१०/२०१८
## दि.०९/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३१२/१८,भादविक ४५४,३८०,५११ |
| **फिर्यादी** | अंकुश आमकर,वय-५० वर्षे,रा.पौडरोड कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/१०/२०१८ रोजी ११/३० वा.ते १६/०० वा.चे दरम्यान मनोज व्हीला सोसायटी,फ्लॅट नं. ७,एचडीएफसी बॅके समोर पौडरोड कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण २,९३,०००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.जे.वाघमारे ९४०३११३५२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५२४/१८,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हे.१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | नितीन शिंदे,पो.हवा. भारती विद्यापीठ, पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | एक अज्ञात वाहनचालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/१०/२०१८ रोजी ११/०० वा. काशी विश्वेश्वर मंदीरा जवळ,भारती विद्यापीठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात वाहनचालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी महिला श्रीमती. रुक्मिणी श्रीराम तांबे,वय-६० वर्ष,रा.संतोशनगर कात्रज,पुणे हया सच्चाईमातानगर या रोडने रहाते घरातुन काशीविश्वेश्वर मंदीराकडे देवदर्शनासाठी पायी जात असताना,हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.आर.मदने ९८८१३७०५०१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४०९/१८,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | रमेश कुलकर्णी,वय-५० वर्षे,रा.मुद्रे-बुद्रुक,ता.कर्जत,जि.रायगड |
| **आरोपी** | एक इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१८ रोजी ते दि.२१/०७/२०१८ रोजीपर्यंत जस्ट डाईल कंपनीने शॉप नं.२,एच नं.१००२,मुक्ता अपार्टमेंट,शुक्रवार पेठ,नटराज हॉटेल जवळ,स्वारगेटच्या मागे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची पत्नी हिने यातील नमुद इसम व महिलांचे वरील नमुद ऑफिस मध्ये जावुन त्यांना समक्ष भेटुन,त्यांचेकडे काश्मिर येथे जाणेबाबत तिकीटांची चौकशी करून त्यांनी पाच तिकीटाचे पॅकेज मध्ये कश्मिर येथे विमानाने जाण्या-येण्याचे तिकीट व तेथे जेवणाची, राहण्याची व फिरण्याची सोय असे पॅकेज असलेले प्रत्येकी तिकीटाचे २५,०००/- रूपये याप्रमाणे असे मिळुन एकुण पाच तिकीटांचे १,२५,०००/- असे बुकींग केले होते. सदर इसम व महिला यांनी फिर्यादी यांचे पत्नीस कोणत्याही प्रकारची विमानाची तिकीटे बुक न करता,फिर्यादी यांना टुरसाठी न पाठवता फिर्यादी यांची १,२५,०००/- रूची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एन.शेख ९६८९९३४२८६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २१९/१८,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | राजेंद्र जोग,वय-५० वर्षे,रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपी** | ट्रिव्हॅगो ट्रिप्स या कंपनीचे मॅनेजर व बुकींग मॅनेजर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०८/२०१८ ते दि.३१/०८/२०१८ रोजीचे कालावधीत पेटीएमव्दारे |
| **तपशिल** | यातील ट्रिव्हॅगो ट्रिप्स या कंपनीचे मॅनेजर व बुकींग मॅनेजर फिर्यादी यांना हॉटेल लेमन ट्री, इंदोर येथे राहण्यासाठीचे बुकींग करुन देण्यासाठी,बुकींग मॅनेजर यांना बोलणी करुन,त्यांना पॅकेजची माहीती देऊन,नमुद कालावधी मध्ये त्यांनी दिलेल्या पेटीएम लिंकवरुन पेटीएम मार्फत ५५,४९९/- रुपये भरुन घेऊन,फिर्यादी यांना हॉटेलची सुविधा उपलब्ध करुन दिली नाही तसेच त्यांचे पैसेही परत न करता,ट्रिव्हॅगो ट्रिप्स या कंपनीने फिर्यादी यांची ५५,४९९/- रुची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.डी.घोडके ९०११११५६६६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३११/१८,भादविक ३५३,३२३,५०४,५०६,३५२,३४ |
| **फिर्यादी** | संतोष राऊत,वय-२८ वर्षे,रा.शिवाजीनगर,पुणे (एमएसईबी,पुणे) |
| **आरोपी** | १.महेश श्रीधर कांटे,वय-२९ वर्षे,रा.वारजे-माळवाडी,पुणे २.विकास श्रीधर कांटे,वय-३५ वर्षे, रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/१०/२०१८ रोजी १३/०० वा. मयुरेश डायनिंग हॉलचे चौकात डावी भुसारी कॉलनी कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महाराष्ट्र राज्य वितरण विभाग,पुणे येथे कार्यरत असुन,ते त्यांचे सरकारी कर्तव्य बजावुन येत असताना,यातील नमुद इसमांनी "तु आमचे दुकानाचे काढलेले विज मीटर पुन्हा बसवून ये" असे म्हणुन त्यांचेशी वाद घालुन,त्यांना अपशब्द वापरुन, धक्का-बुक्की करून त्यांना मारण्यासाठी त्यांचे अंगावर धावुन येवुन,तुला ऊभा जाळीन अशी धमकी देवुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.ए.मुंढे ९४०३७३८५८९ |

## दि.१०/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४११/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | दत्तात्रय कडु,वय-२७ वर्षे,रा.जनता वसाहत,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी पहाटे ०१/१५वा. चे सुमारास दुर्गा रेस्टॉरन्ट बारचे अलीकडे फुटपाथवर स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पी.एम.पी.एम.एल. मध्ये बसवर चालक असुन,ते त्यांची बस डेपोला लावुन चालत त्यांचे राहते घरी पायी जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून पत्ता विचारण्याचे बहाण्याने त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे खिशातील रोख १,५००/- रोख रूपये व एक मोबाईल असा एकुण ११,५००/- रू किमतीचा ऐवज जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.सी.उसगांवकर ७३५०५४७००७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**